# जाहीर प्रकटन

सर्व तमाम नागरिकांना कळविण्यात येते की, पुणे महानगरपालिका आयातकराचे प्रचलित जकातकर नियम २००८, नियम क्र.३९ – **'परतीच्या मालावरील नोंदीसाठीचा लेखनिक खर्च पावती'** आकारणीच्या दरात वाढ करण्याच्या प्रस्तावास पुणे महानगरपालिका मुख्य सभा ठराव क्र.१४९, दि.२८/१०/२००९ अन्वये खाली नमूद केलेल्या परिशिष्ट 'अ' प्रमाणे मान्यता दिली असून, सदर प्रस्ताव नागरिकांना, मा. आयातकर प्रमुख, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय, शिवाजीनगर, पुणे – ०५, सर्व विभागीय क्षेत्रिय आयुक्त कार्यालय, सर्व क्षेत्रिय कार्यालय येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते ५.४५ या वेळेत पाहता येईल. तसेच पुणे महानगरपालिका www.punecorporation.org या वेबसाईटवर सुध्दा पाहता येईल.याबाबत नागरिकांना त्यांच्या लेखी हरकती व सूचना देणे असल्यास त्या प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मा.आयातकर प्रमुख, पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय, शिवाजीनगर, पुणे – ०५ येथे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते ५.४५ या वेळेत आणून दयाव्यात. सदर नमूद मुदतीनंतर आलेल्या हरकती सूचनांचा विचार केला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

## परिशिष्ट 'अ'

जकातकर नियम २००८, नियम क्र.३९ – **'परतीच्या मालावरील नोंदीसाठीचा लेखनिक खर्च पावती'**

पुणे महानगरपालिकेच्या आयात सिमेतून जो माल परत येण्याच्या उद्देशाने हद्दीबाहेर पाठविला जातो त्यामध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे. त्यासाठी दोन महिन्याला रू.१००/– ऐवजी किमान रू.५००/– ते कमाल रू.१०००/– याप्रमाणे तसेच त्यापुढील प्रत्येक दोन महिन्याच्या दोन मुदतवाढीसाठी प्रत्येकी किमान रू.५००/– ते कमाल रू.१०००/– याप्रमाणे परतीच्या मालावरील नोंदीसाठीचा लेखनिक खर्च पावती आकारणीच्या रक्कमेमध्ये वाढ करण्यास व सन २००९–१० या आर्थिक वर्षासाठी किमान दराने आकारणी करण्यास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५४, ४५५ व कलम १४९ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करण्यास मा. मुख्य सभा ठराव क्र.१४९, दि.२८/१०/२००९ ने मान्यता देण्यात आली आहे.

कळावे,

**महापालिका आयुक्त**
पुणे महानगरपालिका